International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 12 No.2 Nov-Dec 2024

# लोकसाहित्यातील लोकधारांचा अभ्यास

**डॉ. राजश्री पराग देशपांडे**
M.A., M.Ed., Ph.D. ( मराठी ) सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, फर्ग्युसन कॉलेज,पुणे.
**Corresponding Author: डॉ. राजश्री पराग देशपांडे**
**DOI- 10.5281/zenodo.17004292**

**सारांश**

लोकसाहित्य हा मानवाच्या जीवनातील अनुभव, श्रद्धा, भावना, संस्कृती आणि सामाजिक नात्यांचा जिवंत दस्तऐवज आहे. लोकसाहित्यातील विविध लोकधारा—अभंग, पोवाडे, लावणी, ओव्या, भारुडे, लोकगीते, लोककथा, लोकनाट्य इत्यादी—समाजातील सामूहिक जीवन, सांस्कृतिक परंपरा, धार्मिक श्रद्धा व ऐतिहासिक स्मृतीचे प्रतिबिंब दाखवतात. सामाजिक जीवनात लोकगीतांमधून सामूहिकता, स्त्रियांचे अनुभव, वीरशौर्य व परंपरागत समारंभांची झलक दिसते; सांस्कृतिक आयुष्यात कला, बोलीभाषा, सण-उत्सव व मनोरंजनपर परंपरा जपल्या जातात; तर धार्मिक जीवनात भक्ती, समन्वय व विधींचे दर्शन घडते. संत तुकारामांचे अभंग समाजात अध्यात्मिकता निर्माण करतात, तर वीरशौर्याचे पोवाडे सामूहिक धैर्य आणि देशभक्ती जागवतात. अशा लोकधारा परंपरा आणि आधुनिकतेला जोडणारा सेतू निर्माण करून सामाजिक-सांस्कृतिक ऐक्य व लोकस्मृती दृढ करतात.

**मुख्यशब्द**: लोकसाहित्य, लोकधारा, अभंग, पोवाडा, लावणी, भारुड, लोकनाट्य, सांस्कृतिक परंपरा, धार्मिक श्रद्धा, सामाजिक जीवन, संतसाहित्य, वारकरी परंपरा.

**प्रस्तावना**

मानवाने आपल्या अनुभव, भावना, श्रद्धा, भीती, आशा-आकांक्षा यांना अभिव्यक्त करण्यासाठी लोकसाहित्याची निर्मिती केली. हे साहित्य श्रुतीपरंपरेने पुढे गेले. लोकसाहित्यामध्ये विविध कलात्मक प्रवाह दिसतात, त्यांनाच **लोकधारा** असे म्हटले जाते. भारतात ‘लोक’ हा शब्द प्राचीन काळापासून विविध अर्थानी वापरला जातो. स्वर्ग, मृत्यू, पाताळ इ. त्रिभुवनांसाठी ‘लोक’ हे उत्तरपद म्हणून वापरले जाते. उदा., स्वर्गलोक वगैरे. आपल्याखेरीज अन्य समूहांसाठी ‘लोक’शब्द वापरला जातो. हिंदी भाषेत जन, जनपद, ग्राम्य असे शब्द लोक (फोक) या अर्थाने रुळवण्याचा प्रयत्न झाला. डॉ. श्याम परमार यांनी ‘लोक’ शब्दाची नेमकी व्याप्ती विशद केली आहे. ते म्हणतात *“लोक’ साधारण जनसमाज है, जिसमें भू-भागपर फैले हुए समस्त प्रकारके मानव सम्मिलित है। यह शब्द वर्गभेदरहित, व्यापक, एवं प्राचीन परम्पराओंकी श्रेष्ठ राशिसहित अर्वाचीन सभ्यता, संस्कृती के कल्याणमय विवेचन का द्योतक है।”*– प्राचीन काळी संस्कृतात वैदिकेतरांसाठी ‘लोक’ संज्ञा रूढ होती. परंतु नंतर वैदिक-वैदिकेतरांतील अंतर मिटत गेले आणि त्यातील ‘लोक’ शब्दाचा अर्थही व्यवहारातून गेला. इंग्रजीमध्ये ‘फोक’ हा शब्द ‘नागरी’ (सिव्हिलाइज्ड) या शब्दाच्या विरुद्ध छटेने आणि काहीसा हेटाळणीपूर्वक वापरला जातो. मात्र ‘फोकलोअर’ मधील ‘फोक’ मध्ये ही छटा नाही. मराठी ‘लोक’पदाच्या अर्थामध्ये तर ही छटा नाहीच.

गेल्या शतकात लोकसाहित्याचा अभ्यास सुरू झाला तो मानवशास्त्राच्या अनुषंगाने. पुढे एक स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून या अध्ययनक्षेत्राची प्रतिष्ठा स्थिर झाली, तरीही त्याचे मानवशास्त्राशी समाजशास्त्राशी असलेले जिव्हाळ्याचे नाते तसेच अभंग राहिले. किंबहुना लोकसाहित्य हे लोकजीवनाच्या सर्व अंगांना आणि अंतरंगविशेषांना स्पर्श करणारे असल्यामुळे लोकसाहित्याचे अध्ययनक्षेत्र हे एक प्रकारे सर्व मानव्यविद्यांचे/सामाजिक शास्त्रांचे मायपोटच मानले गेले पश्चिमेकडे लोकसाहित्याचा अभ्यास या गांभीर्यानेच केला जातो आणि अन्य मानव्यविद्यांचे अभ्यासक लोकसाहित्याच्या अभ्यासाशी अनुबंध राखून आपले ज्ञानक्षेत्र समृद्ध करीत राहतात. आज मानवशास्त्र, समाजशास्त्र, धर्मेतिहास, राजकीय-सामाजिक इतिहास, एवढेच नव्हे, तर समकालीन जगातील राजकीय-सामाजिक घडामोडी यांचा अभ्यास समग्र दृष्टीने करणारे थोर अभ्यासक लोकसाहित्याच्या अभ्यासाची दखल घेतल्यावाचून राहत नाहीत. दुर्दैवाने महाराष्ट्रात एखाद-दुसरा सन्मान्य अपवाद वगळता, लोकसाहित्याच्या अभ्यासाचे हे गांभीर्य त्या क्षेत्रात काम करणाऱ्यांच्या ध्यानी आलेले दिसत नाही, आणि अन्य मानव्यविद्यांचे अभ्यासकही लोकतत्त्वीय अध्ययनदृष्टीचे उपयोजन आपापल्या अध्ययनक्षेत्रात मुळीच करीत नाहीत.

उदाहरणार्थ, आपण इतिहासाचे अध्ययनक्षेत्र पाहू. महाराष्ट्रात इतिहाससंशोधनाचे भरभक्कम पायाभरण करणारे पहिले थोर संशोधक इतिहासाचार्य राजवाडे होत. राजवाड्यांच्या दृष्टीपुढे इतिहासाची जी संकल्पना होती, ती अत्यंत व्यापक होती. समाजजीवनाच्या सर्वांगीण स्थितिगतीचे चित्र त्यांच्या इतिहाससंकल्पनेत सामावलेले होते. त्यामुळे त्यांनी इतिहासाच्या वस्तुनिष्ठ रचनेला नितांत उपकारक असणाऱ्या साधनांची जेवढी कदर केली, तेवढीच त्यांच्या दृष्टीने 'भ्रांत' ठरलेल्या मौखिक परंपरेतील लोकपरंपरेतील साधनांचीही योग्य ती दखल घेतली. ' वस्तुनिष्ठ दृष्टीने इतिहास लिहिण्यासाठी अस्सल कागदपत्रे, शिलालेख, ताम्रपट, नाणी, वास्तू, वस्तू इत्यादींचाच वापर करणे योग्य, यावर जसा त्यांचा कटाक्ष होता, तसेच ज्या समाजाचा इतिहास आपल्याला सिद्ध करायचा असेल, त्या समाजाच्या मनोवस्थेचा, त्याच्या धारणांचा, जीवनदृष्टीचा, श्रद्धासंकेतांचा धांडोळा घेण्यासाठी 'भ्रांत' मानल्या गेलेल्या साधनांचीच कास धरली पाहिजे, हेही त्यांनी पुरतेपणी जाणले होते. ज्ञानकोशकार केतकरांनी तर 'प्राचीन महाराष्ट्रा'चे दर्शन घडविण्याचा जो भव्य प्रयत्न केला आहे, तो अशा प्रकारच्या लोकपरंपरेतील साधनांवर भर देऊनच केला आहे.

**लोकसाहित्याचे संकलन**

लोकसाहित्य संकलनाच्या मुख्यतः दोन पद्धती स्वीकारण्यात आलेल्या आहेत. त्यात क्षेत्रीय संकलन पद्धती आणि स्तरीय संकलन पद्धतींचा अंतर्भाव होतो. (मांडे प्रभाकर, २०१८:१५३) त्यापैकी क्षेत्रीय संकलन पद्धतीमध्ये एकाच भूभागातील किंवा प्रदेशातील विविध प्रकारच्या लोकवाङ्मयाचे संकलन केले जाते. स्तरीय संकलन पद्धतीमध्ये एकाच प्रदेशातील किंवा राष्ट्रातील विविध भागांमध्ये एकाच धारणेच्या अनुषंगाने किती व कोणकोणत्या प्रकारचे बदल संभवले जातात, यापद्धतीने संकलन केले जाते. मराठी लोकसाहित्याचा विचार करता महाराष्ट्रातील विविध भूभागांमध्ये प्रचलित असणाऱ्या लोकसाहित्याचे संकलन संशोधनाच्या गरजेनुरूप संकलित करण्यात आलेले आहे; परंतु हे संकलित वाङ्मय खूप मोठ्या प्रमाणात ग्रंथरूपाने प्रसिद्ध करण्यात आलेले नाही. संकलित वाङ्मयाच्या आधारे संशोधन करून संशोधनपर ग्रंथ मात्र प्रसिद्ध झालेले आहेत. मराठी लोकसाहित्याच्या संकलनाचा इतिहाससुद्धा याच पद्धतीने पाहावा लागतो. उपलब्ध पुराव्यानुसार आधुनिक कालखंडातील (१८६८) मिस मेरी फ्रियर यांच्या 'ओल्ड डेक्कन डेज्'चा उल्लेख करावा लागतो. त्यात महाराष्ट्रातील लोककथांचे संकलन करण्यात आलेले आहे. म्हणजेच, एकोणिसाव्या शतकाच्या मध्यानंतर महाराष्ट्रात या पहिला प्रयत्न झालेला दिसतो. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीही एक लोकगीत १८७८ साली निबंधमालेत छापल्याचा उल्लेख सापडतो. तेही संकलनच आहे. १८४२ साली ज्ञानसिंधू छापखान्याने 'फुर्दुक वही' नावाचा म्हणींचा संग्रह संपादित केल्याचे उल्लेख आहेत. 'निर्णयसागर'ने १८७२ साली लोकगीतांचे संकलन करून 'स्त्रीगीतसंग्रह' प्रसिद्ध केला होता. 'स्त्री-गीत मनोरंजिका' हा १८८५ तर भातुकली हा ओव्यांचा संग्रह १९१५ साली प्रसिद्ध झाला. कहाण्यांचे पहिले पुस्तक विशू दिवाकर वैद्य यांनी १८८८ साली संपादित केले.

**लोकधारांमधील सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक प्रतिबिंब**

**१. सामाजिक प्रतिबिंब**

- समूहजीवनाचा आधार : लोकगीते, नृत्य, नाट्य यामध्ये संपूर्ण समाजाचा सहभाग असतो. लग्नगीते, झिम्मा-फुगडी, पोवाडे यांमधून समाजाचे सामूहिक भावविश्व दिसते.
- स्त्रियांचे जीवन : ओव्या, गवळणी, झोपाळयाची गीते यांतून स्त्रियांचे दैनंदिन अनुभव, दुःख-सुख, आशा-आकांक्षा प्रकट होतात.
- वीरशौर्य व सामाजिक मूल्ये : पोवाडे, लावण्या यांतून शूरवीरांचे गौरवगीत गाताना समाजाला धैर्य, निष्ठा आणि कर्तव्याची जाणीव करून दिली जाते.
- सामाजिक प्रथा व समारंभ : जत्रा, मेळे, समारंभ यांमध्ये लोकधारा लोकांना एकत्र आणतात, सामूहिकता दृढ करतात.

**२. सांस्कृतिक प्रतिबिंब**

- सण-उत्सवांची परंपरा : दिवाळी, होळी, गणेशोत्सव, गोकुळाष्टमी यांसारख्या सणांमध्ये गायली जाणारी गीते व केले जाणारे नृत्य ही सांस्कृतिक अभिव्यक्ती आहे.
- कला व सौंदर्यदृष्टी : रांगोळी, वॉरळी चित्रे, गोंड कला यांतून लोकांची कलात्मकता व निसर्गाशी नाते दिसते.
- भाषिक वैविध्य : लोकगीत व लोककथांमधून प्रादेशिक बोली, भाषिक वैशिष्ट्ये जपली जातात, त्यामुळे सांस्कृतिक वारसा टिकतो.
- मनोरंजन व शिक्षण : तमाशा, दशावतार, भारुडे या लोकनाट्यांतून प्रबोधनासह रंजनाची परंपरा ही सांस्कृतिक बाजू दाखवते.

**३. धार्मिक प्रतिबिंब**

- भक्तीभाव : वारकरी संप्रदायातील दिंडी, वारी, अभंग, भजन, कीर्तन यांतून जनतेचा ईश्वरनिष्ठ भाव दिसतो.
- दैवतांची महती : पोवाडे, गवळणी, गोंधळ यात देव-देवतांचे शौर्य, करुणा, कृपा यांचे वर्णन केले जाते.

- सांप्रदायिक एकात्मता : संतकाव्ये, कीर्तन यातून जाती-धर्मभेद न मानणारा सर्वसमावेशक धार्मिक दृष्टिकोन प्रकट होतो.
- विधीपरंपरा : लग्नातील मंगलाष्टके, धार्मिक उत्सवांतील भजनी नाटिका या धार्मिक जीवनशैलीचे द्योतक आहेत.

**संत तुकारामांचे अभंग, वीरशौर्याचे पोवाडे व लोकधारा**

लोकसाहित्य हा एखाद्या समाजाचा जिवंत इतिहास असतो. लेखनाच्या सीमेत न अडकता तो लोकांच्या मुखातून, कंठातून आणि कृतीतून परंपरेने पुढे नेला जातो. लोकसाहित्यातील विविध प्रवाहांपैकी भक्तिपर अभंग आणि शौर्यपर पोवाडे हे दोन प्रवाह विशेषत्वाने लक्षात घेण्याजोगे आहेत. संत तुकारामांच्या अभंगांनी लोकमनात अध्यात्मिक शांती व भक्तिभाव जागृत केला; तर वीरशौर्याच्या पोवाड्यांनी स्वराज्यलढ्याचा इतिहास लोकांपुढे जिवंत केला. या दोन्ही प्रवाहांनी मराठी लोकसाहित्याला समृद्ध परंपरा लाभवून दिली. संत तुकारामांचे अभंग आणि वीरशौर्याचे पोवाडे हे मराठी लोकसाहित्यातील दोन महत्त्वाचे प्रवाह आहेत. अभंगांनी समाजाला अध्यात्मिक शक्ती, आत्मचिंतन व भक्तिभाव दिला; तर पोवाड्यांनी स्वराज्यलढ्याचे शौर्य, देशभक्ती व सामूहिक ऐक्य जागवले. या दोन्ही प्रवाहांनी लोकसाहित्याला अद्वितीय संपन्नता दिली आहे. अभंग हे लोकमनाचे आध्यात्मिक गीत तर पोवाडे हे लोकमनाचे वीरगीत आहेत. त्यामुळे ते केवळ साहित्यरूप न राहता समाजाच्या जीवनमूल्यांचा जिवंत वारसा ठरतात.

**लोकनाट्यधारा**

मराठी लोकसाहित्यातील लोकधारांचा अभ्यास करतांना रंगभूमीचे मूलस्रोत शोधणेही क्रमप्राप्त ठरते. ज्याप्रमाणे दशावतार नाटक व भागवत नाटक, गोंधळ-पवाडे, भारुडांची नाट्यमय सृष्टी, त्याचप्रमाणे ललित, काला आणि कीर्तन या पारंपरिक नाट्यविधांचाही परामर्श घ्यायला हवा. या प्रकारांपैकी गोंधळ, तसेच भारुडांना प्रेरक ठरलेल्या अन्य लोकधर्मीय संस्था यांचा विचार मी धर्मेतिहासाच्या दृष्टीने अन्यत्र विस्ताराने केलेला आहे; वैदिक पूजन हाही तशा क्रीडांत रंगून जात असला पाहिजे, अशी कल्पना करणे अवास्तव ठरणार नाही. मराठी संतांचा आराध्यदेव श्रीविठ्ठल हाही मूळचा गोपजनांचाच देव आहे आणि संतांनी त्याचा स्वीकार पूर्वप्रतिष्ठित गोपजनांच्या देवाच्या, म्हणजे गोपाळ कृष्णाच्या रूपात केलेला आहे. त्यामुळे मराठी संतांनी आपल्या उपासनेच्या संभारात उपास्याच्या गोपप्रकृतीची स्मृती राखणारा 'काला' श्रद्धेने स्वीकारला आणि आपल्या वाङ्मयसंभारात 'बाळक्रीडा रचनेची परंपराही सातत्याने राखली.

ललिताचे दोन अर्थ आहेत : (१) 'शेवटचे (भजनाच्या अखेरचे) मंगळ गाणे' आणि २) 'सोगे आणून केलेले कीर्तन, यांपैकी दुसऱ्या अर्थाचा नाट्याशी संबंध आहे.

( 'पूर्वी ललित ज्या वेळी रूढ होते, त्या वेळी ते कीर्तनाचा अंतिम भाग असे. त्या भागात मुख्य कीर्तन ज्या आख्यानावर असे, त्या आख्यानप्रसंगाची सोंगे सजवूनच ललित साजरे होत असे.' आज आपल्याला केव्हा तरी जे ललित पहायला मिळते, ते म्हणजे भारुडांचे अभिनीत स्वरूप होय. ज्या कार्यक्रमात संतांची भारुडे प्रत्यक्ष सोंगे घेऊन मंचावर सादर केली जातात, तो कार्यक्रम आपण आज 'ललित' म्हणून ओळखतो. त्याचा कीर्तनाशी साक्षात् संबंध नाही. पुण्यातील शनिवार मारुतीच्या वार्षिक उत्सवात (हनुमान जयंती ते अक्षयतृतीया) काही वर्षांपूर्वीपर्यंत रोज रात्री कीर्तने होत आणि शेवटच्या दिवशी ललित होत असे. अर्थात् ते स्वतंत्र असे; कीर्तनाचा भाग म्हणून नसे. आज तेथे फक्त कीर्तनेच होतात; ललित होत नाही. तसेच 'पवाड' (अद्भुत, अतिमानवी वा दैवी कृती, परमेश्वराची लीला) ज्यांत वर्णिले जातात, त्या पवाडांचाही मूलोदय शोधण्याचा प्रयत्न अन्यत्र केलेला आहे. अर्थात् येथे पूर्वचर्चित प्रकारांचा विचार दूर ठेवून, ललित, काला व कीर्तन यांविषयी काही पूरक विचार मांडीत आहे, काही पोषक सामग्री सादर करीत आहे.

ललित, काला व कीर्तन यांपैकी काला अतिप्राचीन आहे त्याचे मूळ सुदूरच्या वेदकाळात, कदाचित् वेदपूर्वकाळातही आहे. गोपालक, पथशोधक, पथप्रदर्शक, यष्टिधर, मेषवाहन असा भटक्या गोपजनांचा देव जो पूषन्, त्याला वैदिक ऋषींनी 'दंतहीन' मानले आहे आणि त्यामुळे त्याला 'काला' (करंभ) अत्यंत प्रिय असल्याचे म्हटले आहे. पूषन्चा वारसा सांभाळणारा पौराणिक गोपाळ कृष्ण जर 'काला' सेवन करण्याच्या वेळी आपल्या सवंगड्यांसह नाना प्रकारच्या क्रीडानाट्यात रंगून जातो, हे आपणांस पक्के माहीत आहे.

**लोकतत्त्वाने भारलेले कथन-नाट्य**

मराठी संतांच्या 'बहुरूपी' गीतसृष्टीत 'कैको' ही आदिशक्तीच्या भूमिकेत प्रकटली आहे किंवा आदिशक्ती ही 'कैको 'च्या रूपात संचारली आहे, असे विलक्षण दृश्य आपल्याला कैकोविषयक भारूड-रचनांत पहायला मिळते. भारुडांचा अपवाद वगळता, 'उपरा' पूर्व मराठी साहित्याच्या प्रदीर्घ परंपरेत कैकोचे दर्शन अन्यत्र क्वचितच घडते. रूपकाचा विषय न बनवता, आपल्या काव्यात कैकोला विलक्षण लक्षणीय स्थान देणारा एकमेव कवी आहे नवरस-नारायण. या महानुभाव संप्रदायी कवीने

लोकसरणीत रचलेल्या आपल्या 'शल्यपर्व' नामक काव्यात कैकोचे आविष्करण घडविण्यासाठी एक रोमहर्षक प्रसंग आपल्या मुक्त कल्पनाशक्तीतून चित्रित केला आहे. नवरसनारायण हा इ. स. च्या सोळाव्या शतकातला कवी. तो संप्रदायाने महानुभाव असला, तरी त्याच्या काव्यात कृष्णसर्वोत्तमत्वाशिवाय सांप्रदायिकतेचा रंग फारसा गडद नाही. तसेच त्याने महाभारताच्या शल्यपर्वावर आधारलेले काव्य रचले असले, तरी त्यात व्यासानुसरणापेक्षा मुक्त लोकधर्मी कल्पनाशक्तीचाच प्रभाव अधिक आहे. प्राचीन मराठी वाङ्मयपरंपरेत लोकतत्त्वाने पूर्णतः भारलेली जी काही दीर्घ कथाकाव्ये आहेत, त्यांत नवरस-नारायणाचे हे 'शल्यपर्व' अत्यंत समृद्ध काव्य आहे. ऐकता ऐकता श्रोत्यांच्या कानांना ज्यामुळे डोळे फुटतील, असे कथन-नाट्याचे थरारून टाकणारे विशेष नवरसनारायणाच्या लोकधर्मी कथन-शैलीत आहेत.

**पंचतंत्राचे रचना-प्रयोजन**

पंचतंत्र हा नीतिकथांचा संग्रह आहे, हे आपण पाहिले आहे. पंचतंत्राच्या प्रारंभीच 'कथामुखा'मध्ये त्याचे रचनाप्रयोजन स्पष्ट केलेले आहे. अमरशक्ती राजाच्या तीन 'शास्त्रविमुख' आणि 'विवेकरहित' अशा पुत्रांना केवळ सहा महिन्यांच्या काळात 'नीतिशास्त्रज्ञ' बनविण्याचे आव्हान स्वीकारून विष्णुशर्म्याने हा नीतिबोधक कथांचा संग्रह एका सूत्रात गुंफला आहे. म्हणजे पंचतंत्राचे श्रोते आहेत तीन राजकुमार, जे शास्त्रविमुख आणि विवेकरहित आहेत. त्यांना नीतीचे ज्ञान हवे आहे; पण ती नीती आहे ऐहिक जीवनाशी संबद्ध. धर्म, अर्थ आणि काम या त्रिविध पुरुषार्थांशी संबद्ध. मोक्षसाधनेशी त्यांना कर्तव्य नाही. त्याचमुळे मनू आदींनी सांगितलेले धर्मशास्त्र, चाणक्य आदींनी सांगितलेले अर्थशास्त्र आणि वात्स्यायन आदिंनी सांगितलेले कामशास्त्र यांचे ज्ञान राजकुमारांना व्हावे, त्यांच्या ठायी बुद्धिप्रकाश फाकावा, अशी राजाची इच्छा आहे. परंतु जीविताची मर्यादा आणि ज्ञानाची असीमता व अनंतता ध्यानी घेता हे सारे ज्ञान संक्षेपाने, पण नेमकेपणाने प्राप्त झाले पाहिजे. ते केवळ पुस्तकी न राहता व्यवहाराच्या, नाना जीवनप्रसंगाच्या संदर्भासह प्राप्त झाले पाहिजे, अशी राजाची स्वाभाविक अपेक्षा आहे. विष्णुशर्म्याने जो कथारूपाचा आश्रय केला आहे, तो या जीवनसंदर्भाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण पंचतंत्रातल्या कथासंभारांतून उमलून आलेले नीतिशास्त्र हे तत्त्वजड राहिलेले नाही: केवळ सुभाषितभांडारासारखे बनलेले नाही; तर नाना प्रकारच्या जीवनासंदर्भात विश्वासू सोबत करणाऱ्या मित्रासारखे बनले आहे.

पंचतंत्राचे श्रोते हे 'नीतिशास्त्रज्ञ' होण्याची अपेक्षा राखून अध्ययनाला प्रवृत्त झालेले आहेत, हे आपण कथामुखावरून पाहिलेच आहे. पंचतंत्रातील कथांमधून जी नीती परिस्फुटित होत आहे, ही नीती मोक्षप्रवण धर्माशी संबद्ध नसून इहप्रवण राजनीतीशी आणि व्यवहारचातुर्याशी संबद्ध आहे. हे इहलोकींचे जीवन वैयक्तिक आणि सामूहिक संदर्भात यशस्वी कसे करावे, त्यात सावधान कसे सांभाळावे, वंचना कशी टाळावी, विपरीत प्रसंगावर मात कशी करावी आणि 'शठं प्रति शाठ्यम्' य तत्त्वाचा अवलंब करून जीवनसंघर्षात टिकाव कसा धरावा, याचाच बोध पंचतंत्रातल्या कथांतून उमलून येतो. म्हणजे पंचतंत्रातल्या नीतिकथा या चातुर्यकथा आहेत; व्यवहार नीतिकथा आहेत. या कथा वाचताना 'येथे चातुर्य शहाणे झाले!' अशी जाणीव वाचकांच्या मनात जागल्यावाचून राहत नाही.

**निष्कर्ष**

लोकसाहित्यातील लोकधारा या भारतीय संस्कृतीचा आत्मा आहेत. या धारांतून समाजाचा इतिहास, जीवनदृष्टी, अध्यात्म आणि कलात्मकता यांचे दर्शन घडते. आजच्या तंत्रयुगात लोकधारांचे रूप बदलले तरी त्यांची जीवंतता टिकून आहे. त्यामुळे लोकसाहित्यातील लोकधारा या केवळ भूतकाळातील परंपरा नसून आजही वर्तमानाशी निगडित आणि भविष्याला दिशा देणाऱ्या आहेत. लोकसाहित्य हा एखाद्या समाजाच्या सामूहिक जीवनानुभवाचा, सांस्कृतिक परंपरेचा व भावविश्वाचा जिवंत दस्तऐवज आहे. तो केवळ कलात्मक अभिव्यक्ती नसून सामाजिक रचना, धार्मिक आचार-विचार, सांस्कृतिक मूल्यव्यवस्था आणि लोकांच्या दैनंदिन जीवनाचे प्रतिबिंब दर्शवितो. लोकसाहित्यातील विविध लोकधारा—जसे की संत साहित्य, भजन, अभंग, ओवी, पोवाडा, लावणी, गीते, कथा, दंतकथा व समारंभिक विधी—या सर्वांचा अभ्यास केल्यास आपल्याला मराठी समाजाची सर्वांगीण जाण येते.

लोकसाहित्यातील लोकधारा सामान्य माणसांच्या जीवनातील संघर्ष, श्रममूल्य, स्त्री-पुरुष संबंध, जाती-जमातींचे परस्पर संबंध, दैनंदिन व्यवहार व सामाजिक बंध यांचे वास्तव दर्शन घडवितात. संत तुकारामांच्या अभंगांतून समानता, दया, सहानुभूती व भक्तीभाव यांची सामाजिक जाणीव प्रकटते; तर वीरशौर्याचे पोवाडे लोकांना धैर्य, साहस व ऐक्याची प्रेरणा देतात. अशा प्रकारे लोकधारा सामाजिक ऐक्याची व सामूहिक ओळखीची जपणूक करतात.

लोकसाहित्य ही संस्कृतीची जपणूक करणारी वाहिनी आहे. लावणी, भारूड, गवळणी, झाडण्या, समारंभगीतें यांमधून लोकजीवनातील आनंदोत्सव, दुःखदुःख, निसर्गाशी असलेले नाते व लोककला यांचे प्रतिबिंब उमटते. पोवाड्यांमधील वीरकथा व ऐतिहासिक स्मरण लोकांच्या सांस्कृतिक आत्मसन्मानाला अधोरेखित करतात. यामुळे परंपरा व आधुनिकता यांचा सेतू निर्माण होतो.

लोकधारांमध्ये धार्मिकता ही मूलभूत धारा आहे. संतसाहित्यात भक्तीमार्ग, ज्ञानमार्ग व नामस्मरणाची परंपरा दिसते; तर लोकगीते, वारकरी परंपरा, कीर्तन-भजन यांतून सामूहिक धार्मिक अनुभव आकार घेतो. धर्माचे हे लोकाभिमुख स्वरूप सर्वसामान्यांच्या मनाशी संवाद साधते आणि नैतिक व आध्यात्मिक मूल्ये दृढ करते.

लोकसाहित्यातील लोकधारा या केवळ भूतकाळाचा वारसा नसून वर्तमानातील सामाजिक-धार्मिक- सांस्कृतिक जाणिवांना आकार देणाऱ्या जिवंत परंपरा आहेत. त्या लोकांमध्ये सामूहिक स्मृती, आत्मविश्वास व सांस्कृतिक ओळख दृढ करतात. लोकधारा या शैक्षणिक व संशोधनात्मक दृष्टीने देखील महत्त्वपूर्ण आहेत कारण त्या आपल्या इतिहास, समाजरचना व मानसिकतेचे विश्वसनीय प्रतिबिंब आहेत.

**संदर्भ सूची**


1. **डॉ. श्रीपाद शंकर पुराणिक – *मराठी लोकसाहित्य***
2. लोकगीत, लोककथा, लोकनाट्य यांचा सविस्तर अभ्यास.
3. **डॉ. रा. चिं. ढेरे – *लोकसाहित्याची रूपे***
4. लोकधारांची विविध रूपे व त्यांचे सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ.
5. **डॉ. वि. पा. जोशी – *मराठी लोककथा***
6. लोककथांचे प्रकार, आशय व अर्थ.
7. **डॉ. वि. स. सखाराम – *भारतीय लोकसाहित्य***
8. भारतीय उपखंडातील विविध भाषांतील लोकसाहित्याची परंपरा.
9. **डॉ. वसंत अभ्यंकर – *लोकनाट्य परंपरा***
10. तमाशा, दशावतार यांसारख्या नाट्यप्रकारांचा इतिहास